# विचारशलाका


संपादक : प्रा. नागोराव कुंभार


वर्ष ३७ वे, एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२
जोड अंक १४२, १४३, १४४ व १४५ वा

ISSN 2229-7901
UGC CARE Listed




## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## विशेषांक



ISSN 2229-7901
UGC CARE Listed

# विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३७ वे, एप्रिल २०२२ ते मार्च २०२३, जोड अंक १४२, १४३, १४४ व १४५ वा

वार्षिक वर्गणी : रु. ६००/-, त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/-,
सहावार्षिक वर्गणी : रु. ३६००/-, या अंकाचे मूल्य : रु. ६००/-

संपादक :

**नागोराव कुंभार**

**संपादक मंडळ :**

सूर्यनारायण रणसुभे
अशोक चौसाळकर
हरिदास फेरे
भारती पाटील
मुक्ता कुलकर्णी
राजशेखर सोलापुरे
विवेक घोटाळे
रणधीर शिंदे
प्रकाश कुंभार
विवेक सौताडेकर
ग्यानदेव उपाडे
कुंदा कांबळे

**संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
'आई', शिवनगर, सूतमिल मार्ग,
लातूर - ४१३ ५१२, दूरध्वनी : (०२३८२) २४८१६७,
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६,
E-mail - kumbharnl@gmail.com
Watsapp. No. - 8805982828

☐ या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक, प्रकाशक, मालक, संपादक मंडळ व मुद्रक सहमत असतीलच, असे नाही.

# विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

ISSN 2229-7901
UGC CARE Listed

वर्ष ३७ वे, एप्रिल २०२२ ते मार्च २०२३, जोड अंक १४२, १४३, १४४ व १४५ वा


## ॥ भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विशेषांक ॥

## ॥ अंतरंग ॥


१. स्वातंत्र्याची ७५ वर्षे : यशापयशाचा आलेख

***डॉ. जनार्दन वाघमारे*** / १

२. स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि संविधानभारत!

***यशवंत मनोहर*** / ४२

३. स्वातंत्र्याची ७५ वर्षे

***सूर्यनारायण रणसुभे*** / ५३

४. विज्ञान आणि तंत्रज्ञान

***डॉ. पंडित विद्यासागर*** / ६०

५. लोकशाहीच्या रस्त्यावरील खाचखळगे

***पन्नालाल सुराणा*** / ७३

६. भारतातील राजकीय पेचप्रसंग आणि त्याची सोडवणूक

***डॉ. अशोक चौसाळकर*** / १२२

७. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : गाभ्याचे भौतिक व सांस्कृतिक पेचप्रसंग

***प्रकाश पवार*** / १३१

८. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि समकालीन प्रश्न

***डॉ. पी. विठ्ठल*** / १४३

९. स्वतंत्र भारतासमोरील आव्हाने

***डॉ. एस.जी. निगळ*** / १५३

१०. स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षांचा : अर्थसंकल्पीय आढावा

***प्रा.डॉ. जे.एफ. पाटील*** / १५८

११. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवाद

***डॉ. राजशेखर सोलापुरे*** / १६५

# ११

# भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवाद

■

**डॉ. राजशेखर सोलापुरे**

**मू**ल्यव्यवस्था निर्मिती ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. अनेक पिढ्यांना आपले सर्वस्व द्यावे लागते तेव्हा कुठे एखादी संस्कृती आणि राजकीय संस्कृती आकार घेत असते. राजकीय संस्कृती ही अखंडित बनविण्यासाठी नागरिकांचा राजकीय मूल्यांप्रती अतूट विश्वास व राजकीय धुरीणांची त्या मूल्यांप्रती सदैव बांधिलकी या दोन बाबी आवश्यक ठरतात. उथळ राज्यकर्ते व भाबडी जनता या दोहोंमुळे राजकीय संस्कृतीला खंडित अवस्था प्राप्त होते. संकुचित निष्ठा या राजकीय संस्कृतीला मारक असतात. उच्चप्रतीची राजकीय मूल्ये स्वीकारलेली राजकीय व्यवस्था एका ध्येयवादाने प्रेरित झालेली असते. हा ध्येयवाद अनेक शतकांचा परिणाम असतो. लोकांना अशा ध्येयवादाचे उचित आकलन जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत राज्यकर्त्यांचे संप्रदाय लोकांना मूळ ध्येयापासून परावृत्त करून आपले ईप्सित साध्य करत राहणार, हे निश्चित.

भारतीय संविधानात आविष्कारी झालेला ध्येयवाद हा निव्वळ संविधान सभेतील चर्चेचाच परिणाम नव्हता तर तो भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातून विकसित झालेल्या संचिताचे रूप होते. संविधानातून मूल्यांना शब्दबद्ध करताना नवभारताच्या प्रारंभीच्या सरकारांनी निर्णय निर्धारण व नीतीद्वारे जो ध्येयवाद बाळगला गेला होता, त्याला शाश्वत प्रवाहित्व कसे देता येईल, यासाठी प्रयत्न केला. पारतंत्र्याचा प्रदीर्घ कालखंड ते विश्वातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र हा प्रवास एका ध्येयवादाचा सातत्यपूर्ण पाठलागच म्हणावा लागेल. आज त्या ध्येयवादाचे विस्मरण घडविण्याचा मुद्दाम प्रयत्न केला जातोय. नव्हे तर प्रसंगी राजकीय इतिहासाचे विद्रुपीकरण करून लोकांना व्यक्तिनिष्ठ इतिहास सांगितला जातो आहे. इतिहासाने आपली खुजी प्रतिमा महाकाय करावी यासाठी प्रसिद्धीचे मार्ग चोखाळले जात आहेत. स्वप्रतिमा लोकांनी

स्वीकारावी यासाठी स्वातंत्र्य आंदोलनात व स्वातंत्र्याच्या प्रारंभीच्या काळात निर्माण झालेल्या, लोकांनी मान्य केलेल्या प्रतिकांना पुसण्याचा अतोनात प्रयत्न केला जात आहे. क्षुद्र वृत्तीच्या जाहिरातबाजीने स्वातंत्र्य आंदोलनातून विकसित झालेला ध्येयवाद, जो ध्येयवादी माणसांनी निर्माण केला आहे तो पुसणे शक्य नसते, हे समजले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाने एक नवी दृष्टी विकसित केली. ज्या जगात परिवर्तने ही रक्तरंजित क्रांतीने होतात हे गृहीतक पक्के बनले होते, त्या जगातच नवीन अहिंसेचा सिद्धांत विकसित करण्यात भारतीयांनी आपले वेगळेपण दाखविले. अनेक पैलू, भिन्न दृष्टिकोन, वेगवेगळे मार्ग चोखाळत स्वातंत्र्याचे ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्यांनी आपल्या विचार व कृतीतून नवे आदर्श व मूल्य जन्माला घातली. त्यावरच आधुनिक भारताची जडण-घडण झाली. आजचा भारत कालच्या भारतीय ध्येयवादाची परिणती आहे.

## प्रारंभीचे प्रयत्न

'जंबुद्वीप' हे नाम धारण केलेला अतिप्राचीन हा प्रदेश राष्ट्र म्हणून फार पूर्वी साकार होऊ शकला नाही. संस्कृतीचे वेगळेपण होतेच परंतु सरंजामशाहीने या प्रदेशाची केलेली खंडात्मक विभागणी सर्व जनसमूहांना भावनिकदृष्ट्या एकसंघ होण्यात सर्वांत मोठी अडचण होती. 'भारतीय' ही अस्मिता तयार होण्यासाठीचे कोणतेच पोषक राजकीय पर्यावरण १९ व्या शतकापर्यंत तयार होऊ शकले नाही. परकीय आक्रमणे होतच राहिली. त्यातून परत वैचारिक परिवर्तने झाली. स्थिरता ही कोणत्याही भूभागाला ऐक्यासाठी पूरक असते. मात्र संक्रमणातच सापडलेल्या भारत भूमीला ऐक्य व एकसंघता दुरापास्त होती. तसेच समाजात विषमता, धार्मिकता, इतकेच नव्हे तर धर्माच्या साह्याने विकसित झालेला संकुचित हट्टवाद यांनी आधुनिकतेला नकारच दिला गेला. राजकीय, सामाजिक व आर्थिक मागासलेपण यामुळे लोक जर्जर झाले.

मध्ययुगीन काळात म्हणजेच इ. स. १६०० ला ब्रिटिश भारतात आले. व्यापारी उद्देशाने भारतात आलेले युरोपियन भारताची लूट करणे या भावनेने प्रारंभी प्रेरित होते. त्यादृष्टीने वखारी स्थापन करणे याला प्राधान्य देतानाच वेगवेगळ्या सत्तास्थानांकडून व्यापारी सनदा प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील होते. ब्रिटिश, पोर्तुगीज, डच, फ्रेंच ही सर्व मंडळी त्यात होती. हे घडत असतानाच मध्ययुगीन कालखंडात एक वेगळा प्रयोग इ. स. १६५० च्या दरम्यान सह्याद्रीच्या कुशीत केला जात होता. तो म्हणजे शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्माण होत होते. 'स्वतःचे राज्य' म्हणजेच 'एतद्देशियांचे राज्य' ही संकल्पना रूढ करण्याचा प्रयत्न शिवाजी महाराज आणि

त्यांच्या सहकाऱ्यांनी केला होता. ब्रिटिशांचा कावेबाजपणा व धूर्तनीती शिवरायांच्या लक्षात आली होती म्हणूनच आपले स्वतंत्र आरमार स्थापण्याला त्यांनी गती दिली होती. अल्पावधीत स्वराज्य निर्मिती करून राज्यनिष्ठा, रयतेचे राज्य (लोकांचे राज्य), लोककल्याणाचे धोरण या संकल्पना मूर्त स्वरूपात आणण्याला छत्रपती शिवाजी महाराजांना यश आले होते. शिवरायांचे रयतेचे राज्य किंवा स्वराज्य विचार हा स्वातंत्र्य आंदोलनात आदर्शाच्या रूपाने अनेकांनी अंगीकारला. लोकचेतना जागृतीचा आणि स्वराज्य ही धारणा या भूमीत रूजविण्याचा हा प्रथम प्रयत्न होता. यापूर्वी महाराणा प्रताप, गुरू गोविंद सिंग आणि अनेकांनी प्रयत्न केले होते. मात्र बलिदान देऊनही त्यांना स्वतःचे संकल्पित प्राप्त करता आले नव्हते.

ज्योतिराव व टिळकापासून ते भगतसिंगापर्यंत छत्रपती शिवरायांचा स्वराज्य विचार राष्ट्र निर्माणाचे व अस्मितेचे स्फुलिंग जागृत करण्याचे साधन म्हणून स्वीकारले गेले. राष्ट्र म्हणून भारत विकसित होण्याचा हा प्रारंभीचा प्रयत्न होता. लोकशाहीची अनेक मूल्ये पुढील काळात आविष्कारीत होण्याची ही नांदी होती.

## राष्ट्रवादाचा प्रसूतिकाळ

वांशिक, धार्मिक, भाषिक एकता, समान हितसंबंध, भविष्यकालीन राजकीय आकांक्षा यांपैकी काही घटकच राष्ट्र व राष्ट्रीयता उत्पन्न करण्यास कारणीभूत ठरतात. यापैकी कोणताही एक घटक १९ व्या शतकात भारतीय समाजात अस्तित्वात नव्हता. उलट बहुराष्ट्रीयत्वाच्या समस्येने ग्रासलेला व राष्ट्रकांचा (राष्ट्रक म्हणजे राष्ट्रीयतेने मुक्त, एकात्मभावाने मुक्त समाज) देश अशी ओळख भारताची होती. मात्र तरीही राज्य निर्माण होण्यासाठी भूमीची गरज असते आणि राष्ट्र निर्मिती लोकांच्या मनोभूमीवर होत असते. लोकांच्या भावनिक ऐक्याने भारत एक राष्ट्र म्हणून विकसित झाला. त्याची सुरुवात होते ती १८५७ च्या उठावाने. (याला स्वातंत्र्य युद्ध, शिपायांचे बंड असे वेगवेगळे संबोधले जाते.) तत्पूर्वी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने २३ जून १७५७ ला प्लासीच्या लढाईत मीर जाफरच्या मदतीने बंगालचा नवाब सिराजउद्दौला यास पराभूत केले होते. २३ ऑक्टोबर १७६४ रोजी अयोध्येचा नवाब शुजाउदौला, मुघल बादशहा शहा आलम दुसरा आणि मीरकासीम यांचा बक्सारच्या लढाईत पराभव केला. या दोन युद्धांनी भारतावर निर्णायक नियंत्रण प्रस्थापित करण्यात ब्रिटिशांना यश आले. पुढे टिपू सुलतानला ठार मारत म्हैसूरवर आपले अधिपत्यही त्यांनी स्थापन केले. एकीकडे प्रत्यक्ष रणभूमीवर एत्तद्देशीयांना परास्त करतानाच दुसरीकडे वेलस्लीची तैनाती फौजेची पद्धती संस्थानांना अंतर्गतदृष्ट्या पोखरण्यात यशस्वी झाली होती. लॉर्ड डलहौसी यांनी

संस्थाने खालसा धोरणाद्वारे निपुत्रिक असणाऱ्या सातारा, नागपूर, झांशी, जगदीशपूर, संबलपूर, वऱ्हाड ही संस्थाने खालसा केली तर अराजकतेचे कारण देत औंधचे राज्यही खालसा केले. देशी संस्थानाबद्दलची ही उद्दाम भूमिका पुढील काळात भारतीय राजेरजवाड्यात ऐक्याचे कारण ठरली. सामान्य लोकांत ब्रिटिशांनी केलेल्या विवाह, बालविवाहबंदी, सतिबंदी या कायद्याबद्दल असंतोष होताच. आर्थिक लूट, भारतीय सैनिकांना सापत्नपणाची वागणूक यामुळे तर ब्रिटिशांबद्दल द्वेष वाढत होता.

ब्रिटिश हे परकीय आहेत आणि आपण सर्व एक आहोत ही भावना १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत प्रबळ बनली होती. या भावनेला प्रचंड स्वरूप प्राप्त झाले ते लष्करात आलेल्या नव्या काडतुसावरील आवरणाने. गाईची व डुकराची चरबी लावलेले हे आवरण दाताने काढून काडतूस वापरावे लागत असे. हिंदूंना गाय पवित्र आणि मुस्लिमांना डुक्कर अपवित्र. त्यामुळे या दोन्ही धर्माच्या सैनिकांनी याविरूद्ध बंडाची भाषा बोलायला सुरुवात केली. चरबीची ही बातमी प्रथम कलकत्ता छावणीत प्रसारित झाली. ब्रिटिश या चरबीच्या बातमीला नाकारत राहिले. परंतु मार्च १८५७ मध्ये मंगल पांडे या सैनिकाने पहिली गोळी झाडली. ८ एप्रिल १८५७ रोजी त्याला फाशी देण्यात आली. १० मे १८५७ रोजी मीरत छावणीतील हिंदी शिपायांनी गोऱ्या अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडून तुरुंग फोडला. 'कंपनीचे राज्य खलास झाले' अशा आरोळ्या ठोकून ते दिल्लीच्या दिशेने निघाले. १२ मे १८५७ रोजी त्यांनी दिल्ली ताब्यात घेतली. मोगल बादशहा बहादूरशहास 'हिंदुस्थानचा सम्राट' म्हणून घोषित केले.

प्लासीच्या १७५७ च्या लढाईपासून भारतावर विजय मिळविण्यासाठी इंग्रजांना शंभर वर्षे लागली. येथील संपत्ती व माणसांचा वापर करून इंग्रजांनी छोट्या-मोठ्या 'एकशे अकरा' लढाया जिंकल्या. या सर्वांचा उद्रेक १८५७ च्या उठावात झाला. खरे पाहता १८५७ चा उठाव भारतातून ब्रिटिश सत्तेच्या उच्चाटनाचा पहिला प्रयत्न मानला जात असला तरी तो तशा प्रकारचा पहिला प्रयत्न होता असे मात्र म्हणता येणार नाही. इ. स. १८०६ मध्ये मद्रास इलाख्यातील छावणीत उठाव झाला. कारण होते, हिंदू सैनिकांनी गंध लावू नये व मुस्लिमांनी दाढी ठेवू नये, असे इंग्रज म्हणत होते. इ. स. १८५४ मध्ये बराकपूर (बंगाल) छावणीत शिपायांनी बंड केले होते. उमाजी नाईकांच्या नेतृत्वाखाली रामोशांचा उठाव झाला होता. हे सर्व प्रयत्न झाले होतेच परंतु व्याप्तीच्या दृष्टीने १८५७ चा उठाव मोठा होता. दिल्ली, कानपूर, झांशी उठाववाल्यांनी इंग्रजांच्या हातून घेतली होती. पूर्वनियोजन नसल्याने आणि ब्रिटिशांची एकूणच शक्ती जास्त असल्याने हा विद्रोह मोडून काढला गेला. "सशस्त्र उठावाने ब्रिटिश सत्ता नष्ट करता

येणार नाही," हा महत्त्वपूर्ण धडा १८५७ ने भारतीयांना शिकविला. १८५७ च्या उठावाने राष्ट्रचेतना जागृत केली, हिंदु-मुस्लीम ऐक्य साधले गेले, एत्तद्देशीय राजेरजवाडे यांच्यात एकोपा निर्माण झाला. अशा अनेक चांगल्या बाबी घडल्या. जस्टिन मॅकार्थी या लेखकाने 'हिस्ट्र ऑफ अवर ओन टाईम्स' या ग्रंथात तत्कालीन भारतीय मानसिकतेचे वर्णन अत्यंत मार्मिकपणे केले आहे. तो म्हणतो, 'काडतुसांना लावलेली चरबी हे केवळ तात्कालिक निमित्त होते.... या ठिणगीने जर हा वणवा पेटला नसता तर दुसऱ्या एका ठिणगीने ते काम केले असते.... मीरतहून दिल्लीला पोहोचलेल्या या शिपायांना त्या क्षणी नेता, झेंडा आणि उद्दिष्ट गवसले होते.' यावरून हे स्पष्ट होते एका ध्येयवादाने झपाटलेली भारतीय मानसिकता १८५७ ला आकार घेतली होती. त्यामुळे हाच भारतीय राष्ट्रवादाचा प्रसूतिकाळ मानावा लागेल.

१८५७ चा लढा अयशस्वी ठरला असला तरी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता १८५८ ला ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून संपविली. भारत ब्रिटिश राजपदाची वसाहत झाला. जबाबदार पद्धतीचा उगम राज्यव्यवस्थेत झाला. १८५८ ला व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध होऊन ब्रिटिशांचा काही प्रमाणात दृष्टिकोन बदलला.

### आर्थिक शोषणाविरुद्धची प्रतिक्रिया आणि प्रहार

चार्लस मेटकाफ यांनी वर्णन केल्याप्रमाणे "भारतीय खेडी म्हणजे जणू छोटी आणि स्वायत्त गणराज्येच होती. राजघराणी बदलत गेली; क्रांतीचे चक्र फिरत गेले; हिंदू, पठाण, मुघल, मराठे, शीख, इंग्रज सत्ताधारी बदलत गेले. पण भारतीय खेडी मात्र जशीच्या तशी राहिली!" इंग्रज राज्यकर्त्यांनी स्वयंपूर्ण ग्रामजीवनावर आघात केले. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था ज्या गावांवर आधारलेली होती, त्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची पारंपरिक घडी विस्कटली. ब्रिटिशपूर्व राज्यकर्त्यांनी भारताच्या ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्थेला शाबूत ठेवले होते. वसाहतवादी व साम्राज्यवादाच्या शोषणव्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या प्रतिक्रिया व्यक्त करताना आपसूकच आर्थिक राष्ट्रवादी विचारांची मांडणी केली गेली.

इ. स. १८७६ मध्ये 'पॉवर्टी ऑफ इंडिया' हे निबंधवजा पुस्तक दादाभाई नौरोजी यांनी प्रसिद्ध केले. या पुस्तकात भारतातील दारिद्र्याची सूक्ष्म चिकित्सा दादाभाईंनी केली. पुढे १९०१ मध्ये 'पॉवर्टी अँड अन-ब्रिटिश रूल इन इंडिया' हा दादाभाईंचा आणखी एक ग्रंथ प्रसिद्ध झाला. दादाभाईंनी संपत्तीच्या नि:सारणाचा (Drain of Wealth) हा सिद्धांत मांडून ब्रिटिशांच्या शोषणावर प्रकाश टाकला. दादाभाईंच्या मते, "गझनीच्या महंमदने त्याच्या १७ स्वाऱ्यांमध्ये मिळून भारताची जेवढी लूट केली, त्या सर्व लुटीपेक्षा अधिक संपत्ती ब्रिटिश लोक दरवर्षी लुटून नेत होते." पुढे दादाभाईंनी

१८५१ ते १८७१ सालापर्यंतच्या कालावधीचा आढावा घेत पुढील आकडेवारी सादर केली. "हिंदी जनतेचे दरडोई वार्षिक उत्पन्न केवळ वीस रुपये एवढे मामुली आहे. खेदजनक बाब ही की, सरकार तुरुंगातील कैद्यांसाठी जो दरडोई खर्च करते, त्याहून हे कमी आहे.... ब्रिटिशांनी शतकाच्या प्रारंभी ही लूट दरसाल तीस लक्ष पौंड याप्रमाणे केली. ती शतकाच्या मध्यापर्यंत तीन कोटी पौंड एवढी झाली. १८९३ साली इंग्लंडमध्ये प्रवाहित होणारी धनसंपदा २५ करोड एवढी होती. १८९७ साली हाच प्रवाह ३५९ करोड एवढा झाला होता. १९०५ ला या लुटीचा प्रवाह ५१५ करोड एवढ्या वेगाने इंग्लंडकडे प्रवाहित होतो आहे. या लुटीने भारतीयांची अवस्था केविलवाणी केली आहे." तर डॉ. ईश्वरप्रसाद यांनी म्हटल्याप्रमाणे, "भारत ही इंग्लंडचे पोट भरणारी दुभती गाय बनली आणि तिची वासरे मात्र उपाशी मरू लागली."

स्वयंपूर्ण खेड्यांवर आघात, नागरीकरणाला चालना, कारागिरांवर उपासमारीची पाळी, यांत्रिकीकरणाला चालना, शोषणाची अघोरी व्यवस्था यामुळे भारत कंगाल व येथील जनता दुर्बल बनली. ब्रिटिशांना हेच हवे होते कारण उपाशी लोक क्रांतीची भाषा बोलणार नाहीत तर ते भाकरीची मागणी करतील, असे इंग्रजांना वाटत होते. मात्र ब्रिटिशांच्या शोषणाचा पाढा वाचून या शोषण व्यवस्थेवर हल्ला करणारे तत्त्वज्ञान येथील माणसांनी मांडले. दादाभाई नौरोजींनी १८७१ साली ब्रिटिशांना इशारा दिला होता की, "हिंदुस्थानचे दारिद्र्य असेच वाढत गेले, तर इंग्रज साम्राज्याची नौका याच खडकावर आदळून फुटेल."

आर्थिक शोषणाने झालेली दुर्गती यामुळे भारतीय लोकांच्या मनात ब्रिटिश सत्तेबद्दल असंतोष निर्माण झाला. ज्याचा परिणाम राष्ट्रवादाला बळकटी मिळण्याला आणि साम्राज्यवादाला विरोध करत समाजवादी समाजरचनेची प्रस्थापना करण्यासाठी आग्रही भूमिका घेण्यात झाला.

## प्रबोधन पर्वाचा परिघ

ब्रिटिश या देशात राजसत्तेच्या सारीपाटावरील आपला पसारा विस्तारत असतानाच ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी प्रयत्नशील होते. भारतीय धर्मांची जमेल तितकी निर्भत्सना केली जात होती. भारतीय धर्म ही कर्मकांड, विषमता व जातिव्यवस्थेने भ्रष्ट झाले होते. माणसांना अमानवी वागणूक देत धर्माला पोट भरण्याचा धंदा करणाऱ्या तथाकथित उच्चवर्णीयांनी माणसा-माणसांत फूट पाडली होती. पुरोहितशाहीने धर्माचे अस्सल रूप गिळंकृत केले होते. धर्माद्वारेही ऐक्य निर्माण करता येते हे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून काही मंडळींना लक्षात येऊ लागले आणि त्यांच्या विवेकवादी

भूमिकेतून धर्मशुद्धीकरणाच्या चळवळी जन्माला आल्या. हेच नवजागृतीचे युग होते म्हणून याला 'भारतीय प्रबोधन युग' संबोधले गेले. राजा राममोहन रॉय हे भारतीय प्रबोधन युगाचे जनक मानले जातात. भारतीयात नवदृष्टी, नवमूल्ये, नावीन्यता व नैतिकतेचे भरण-पोषण व्हावे यासाठी या प्रबोधन युगात महत्त्वपूर्ण कार्य व वैचारिक मांडणी केली गेली. प्रबोधन काळ परिवर्तनाचा वाहक असतो. अनिष्टतेला नकार देत इष्टतेची प्रस्थापना हा प्रबोधनाचा कार्यक्रम असतो. सामाजिक व धार्मिक स्थित्यंतराचा हा काळ होता.

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नाने विल्यम बेंटिंग यांनी १८२९ साली सती बंदीचा कायदा केला आणि नव्या विचारांचे पर्व सुरू झाले. १८४३ साली गुलामांचा व्यापार करण्याची प्रथा कायद्याने नष्ट केली. १८३७ च्या दरम्यान ठगांचा राक्षसी धंदा कायद्याने संपुष्टात आणला. 'कायद्याचे राज्य' ही संकल्पना दृढ होत असताना सामाजिक उत्थानाचे प्रयत्न केले जाऊ लागले. या मागे बळ होते भारतातील विचारवंत व आधुनिक समाजसुधारकांचे. राजा राममोहन रॉय यांनी १८२८ साली ब्राह्मो समाजाची बंगालमध्ये स्थापना केली. हिंदू समाजातील जातिभेदाचे व मूर्तिपूजक पौराणिक धर्माचे खंडण करणारे तत्त्वज्ञान मांडत एकेश्वरवादाचा पुरस्कार करत मानवतावादी, विश्वबंधुत्ववादी व सर्वधर्मसमभावाचे तत्त्वज्ञान मांडून रॉय व ब्राह्मो समाजाने नवसमाज निर्माणाचे रणशिंग फुंकले.

३० मार्च १८६७ रोजी डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना केली. ब्राह्मो समाजाचा एकेश्वरवाद व मूर्तिपूजेला विरोध यावर प्रार्थना समाजाचा ठाम विश्वास होता. प्रार्थना समाजात प्रार्थना महत्त्वपूर्ण होती. या समाजाने विधवा विवाह, आंतरजातीय विवाह, स्त्री शिक्षण, अनाथालयाची स्थापना या कृती कार्यक्रमांना प्राधान्य दिले.

*'मानवासाठी बहुधर्म कसे । झाला काहो विसे । ज्योती म्हणे ।'* असा अखंड लिहून सार्वजनिक सत्यधर्माचा विचार समाजात रुजविणारे महात्मा फुले यांनी १८७३ साली पुणे शहरात 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. *'सर्वसाक्ष जगत्पती। त्याला नको मध्यस्थी।।'* असा अखंड विचार मांडत पुरोहितशाहीवर हल्ला करणाऱ्या ज्योतिरावांनी निर्मिकाचा विचार मांडला. अनेकेश्वरवादाने व मूर्तिपूजेने जो भारतीय माणसाचा बुद्धिभेद केला होता त्याला विराम देण्यासाठी या सर्व समाजांनी प्रयत्न केला. विवेकबुद्धी प्रामाण्यास मान्यता लाभावी यासाठी सत्यशोधक समाज प्रयत्नशील राहिला. त्यासाठी स्त्री शिक्षण व बहुजनांच्या शिक्षणाचा आग्रह तर फुले दाम्पत्यांनी धरलाच परंतु

त्यासाठी स्वतः मूलभूत कार्य केले. सत्यशोधक समाजाने ब्राह्मणी वर्चस्ववादाला कडाडून विरोध केला. अब्राह्मणी समाजाचे दैन्य, शोषण याला हा वर्चस्ववाद कसा कारणीभूत आहे, याची तार्किक चिकित्सा महात्मा फुले यांनी केली. भारतातील पुढील जातिअंताच्या चळवळी, ब्राह्मणेतर चळवळी व समतावादी तथा परिवर्तनवादी चळवळींना मार्गदर्शक साहित्य व दिशा देण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले.

१० एप्रिल १८७५ ला गिरगाव मुंबई येथे माणिकजी वाटिकेत स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना केली. वैदिक धर्माचे व संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे हे दयानंदांचे स्वप्न होते. राष्ट्रवादाला त्यांनी 'राष्ट्रधर्म' हे संबोधन दिले. 'सत्यार्थप्रकाश' या ग्रंथातून आपल्या विचाराची मांडणी करत आर्य समाजाला भारतभर पोहोचविण्यात दयानंद सरस्वती यशस्वी ठरले. स्वराज्य, स्वशासन, राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रभाषा व स्वधर्मीयांची एकता या चतुःसूत्रीचा राजकीय कार्यक्रम प्रसारित करतानाच जाती व वर्गरहित समाजाचे निर्माण, धर्मांतरित हिंदूची शुद्धिसंमेलने, अस्पृश्यता निर्मूलन, बालविवाह-सतिप्रथेचे उच्चाटन, विधवा विवाहाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अशी विचारसरणी व कार्यक्रम राबवित आर्य समाजाने भारतीय समाजात लोकआंदोलनाची उभारणी केली. आर्य समाज हा सामाजिक व धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता. त्याची व्याप्ती राजकीय क्षेत्रालाही व्यापणारी होती.

स्वामी विवेकानंदांनी १८९७ साली रामकृष्ण मिशनची स्थापना केली. भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता प्रतिपादित करत हिंदूच्या अस्पृश्यता कल्पनेवर कठोर टीका विवेकानंदांनी केली. १८७५ मध्ये श्रीमती एच. पी. ब्लावत्स्की ह्या जर्मन रशियन वंशाच्या महिलेने अमेरिकेत थिऑसोफिकल सोसायटीची स्थापना केली. भारतीय संस्कृती व विचारसरणीचा शोध घेत त्याचा प्रसार करणे या सोसायटीचा उद्देश होता. याशिवाय पाश्चात्त्य प्रभावाविरुद्ध मुसलमानांची सर्वप्रथम प्रतिक्रिया 'वहाबी आंदोलन' किंवा 'वलीउल्लाह आंदोलन' हे पुनर्जागरणाचे आंदोलन होते. अलीगढ चळवळ, देवबंद चळवळ यातून मुस्लिमांच्या जाणिवा जागृत केल्या गेल्या. अमृतसरमध्ये सिंह सभेच्या माध्यमातून शिखांची अकाली सुधारणा चळवळ जन्माला आली. १८५१ साली इंग्रजी शिक्षण घेतलेल्या काही पारशांनी 'रहनुमायी माझदायास्नन सभा' स्थापन केली. नारोज फरदोनजी, दादाभाई नौरोजी, के. आर. कामा यांच्याकडे या चळवळीचे नेतृत्व होते. पारशी धर्म व कर्मकांड यात या चळवळीने सुधारणा केली.

प्रबोधन पर्वातील या सर्व चळवळींनी भारतीय समाज व धर्म जीवन ढवळून काढले. मध्ययुगीन भारतीय समाज मानसिकता आधुनिकताभिमुख करण्यात प्रबोधन

पर्वाचा मोलाचा वाटा आहे. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात ज्या समता, स्वातंत्र्य, बंधुता, सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांना संविधानात स्थान दिले आणि भारतीय जीवनपद्धतीचा ही राजकीय मूल्ये अविभाज्य भाग बनली त्याची रुजवात प्रबोधन पर्वाने केली होती. प्रबोधन पर्वाचा परिघ भविष्यातील समग्र भारतीय जीवनाला व्यापून टाकणारा आहे.

## सुधारणा : दोन दृष्टिकोन

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सुधारणेवरून दोन सुभे निर्माण झाले होते. एक सामाजिक सुधारणा प्रथम म्हणणारा सुभा होता तर दुसरा राजकीय सुधारणा अगोदर म्हणणारा सुभा होता. या दोन दृष्टिकोनाचे समर्थक दिग्गज व्यक्ती होत्या. सामाजिक सुधारणेला अगोदर म्हणणारे गोपाळ गणेश आगरकर म्हणतात, जोपर्यंत समाज स्वातंत्र्यासाठी लायक बनत नाही आणि सामाजिक प्रगती होऊन अविवेकी रुढींचा त्याग केला जात नाही, तोपर्यंत राजकीय स्वातंत्र्य उपयोगाचे होणार नाही. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी हाच पक्ष उचलून धरून म्हटले की, "समाजसुधारणेसाठी केवळ एखादी दुसरी सुधारणा करून चालणार नाही तर संपूर्ण समाजच बदलावयास हवा." सामाजिक सुधारणा करूनच राजकीय सुधारणेचा मार्ग प्रशस्त करता येईल हे सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणाऱ्यांचे मत होते.

राजकीय सुधारणा करून म्हणजे स्वराज्य प्राप्ती करून आपल्या देशात आपण सर्व सामाजिक सुधारणा सहज करू शकतो म्हणणाऱ्या बाजूचे पुरस्कर्ते होते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. टिळकांनी जहाल स्वरूपात राजकीय सुधारणेचा आग्रह करत असताना स्वराज्य प्राप्तीसाठी सर्वांनी प्रथम प्रयत्न करण्याचे आवाहन सर्वांना केले होते.

सुधारणेबद्दल हे दोन दृष्टिकोन मांडले गेले असले तरी ९ मार्च १८८६ ला केसरीच्या अग्रलेखात टिळक म्हणतात, "सध्याच्या आमच्या देशस्थितीत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व काही मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे, असा माझा एकंदरीत ग्रह झाला आहे."

सुधारणेच्या बाबतीत स्वातंत्र्य आंदोलन काळात निर्माण झालेले दोन्ही दृष्टिकोन आपआपल्या जागी योग्य होते. या दोन दृष्टिकोनाने भारताची सामाजिक व राजकीय क्षेत्रे ढवळून तर निघालीच, परंतु या वैचारिक मंथनातून सुधारणेचा समन्वयवादी दृष्टिकोन पुढील काळात विकसित झाला.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना : एक नवा अध्याय

इंडियन सोसायटी (इ. स. १८४३), ब्रिटिश इंडियन असोसिएशन (इ. स. १८५१), इंडियन लीग (इ. स. १८७५) आणि दादाभाई नौरोजी व व्योमेशचंद्र बॅनर्जी यांनी लंडन येथे 'लंडन इंडिया' सोसायटीची स्थापना केली. उपरोक्त सर्व संघटना मर्यादित राजकीय उद्देशाने स्थापन झाल्या होत्या. भारतीय समस्यांची उकल करून त्या समस्या ब्रिटिश सरकारपुढे मांडण्याच्या उद्देशाने भारतीय लोकांनी स्थापन केलेली पहिली संघटना म्हणजे लंडन इंडिया सोसायटी होय. या संघटनेचे रूपांतर ईस्ट इंडिया असोसिएशनमध्ये इ. स. १८६९ साली झाले. भारतातील लोकांचे राजकीयदृष्ट्या भावनात्मक एकीकरण घडवून आणण्यात या संघटनांना काही प्रमाणात यश आले. मात्र राष्ट्रीय पातळीवर प्रभाव पाडणारी संघटना गरजेची होती. या गरजेतूनच २८ डिसेंबर १८८५ रोजी सर ॲलन ऑक्टेव्हिएन ह्युम यांच्या पुढाकाराने, भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या साह्याने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची (राष्ट्रीय सभा) स्थापना झाली. आर. पी. मसानी लिहितात की, "सर ह्युम हे काँग्रेसचे जनक आहेत तर डफरीन काँग्रेसचे पितामह आहेत." सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी, बद्रुद्दीन तय्यबजी यांचा काँग्रेस स्थापन करण्यात महत्त्वपूर्ण वाटा आहे. काँग्रेस का स्थापन केली? याबाबत भिन्न विचारप्रवाह आहेत. लाला लजपतराय यांनी, काँग्रेस म्हणजे ब्रिटिश साम्राज्याचे सुरक्षा कवच म्हणून स्थापिली गेल्याचे म्हटले. ह्युम यांना 'राजभक्त व अहानिकारक' अशा स्वरूपाची राजकीय संस्था बनविण्याचा हेतू होता. २८ डिसेंबर १८८५ ला काँग्रेसचे जे पहिले अधिवेशन मुंबई येथील गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजच्या प्रशस्त सभागृहात भरविण्यात आले, या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी होते. या अधिवेशनात काँग्रेसने पुढील ध्येयावर भर दिला. "या देशावर प्रेम करणाऱ्या समस्त लोकांमध्ये जात, धर्म, प्रांत निरपेक्ष परस्पर प्रेमसंबंध निर्माण करणे आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रीय एकतेची भावना दृढ करणे." काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात जे ध्येय निश्चित केले गेले होते, ते पुढील काळात ध्येयवादात रूपांतरित झाले.

## मवाळ व जहाल : कार्यप्रणालीचे द्वंद्व

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा १८८५ ते १९०५ हा कालखंड मवाळ तर १९०५ ते १९२० हा कालखंड जहाल मानला जातो. मवाळ आणि जहाल मूलतः कार्यपद्धतीचा संघर्ष मानावा लागेल. "मवाळ म्हणजे सौम्य. एकदम मोठे बदल किंवा परिवर्तन न होता रचनात्मक सावकाश परिवर्तन व्हावे," असे मानणारे मवाळ होते.

जहाल या शब्दातून आग्रही लढाऊ बाणा स्पष्ट होतो. विशिष्ट प्रकारचे परिवर्तन वेगाने झाले पाहिजे, त्यासाठी चळवळ, संघर्ष यांचा अवलंब करायला हवा अशी भूमिका जहालवाद्यांची होती.

न्यायमूर्ती रानडे व गोपाळकृष्ण गोखले मवाळांचे नेतृत्व करत होते तर लोकमान्य टिळक जहाल गटाचे नेते होते. लाल, बाल, पाल हे त्रिकुट जहाल मताचे ठळक प्रतीक होते. पट्टाभी सीतारामय्या यांनी आपल्या 'दि हिस्ट्री ऑफ इंडियन काँग्रेस' या ग्रंथात मवाळ पंथीय व जहाल पंथीय यांच्यातील फरक दाखवताना दोघांच्या मतवादांचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, "गोखल्यांना आहे त्या शासनसंस्थेत सुधारणा पाहिजे होत्या तर टिळकांना शासनाची पुनर्बांधणी करावयाची होती. ब्रिटिश नोकरशाहीशी सहकार्य करणे गोखल्यांना आवश्यकच वाटत होते; तर या नोकरशाहीशी दोन हात करणे आवश्यक अशी टिळकांची धारणा होती. शक्य असेल तेथे ब्रिटिशांना सहकार्य द्यावे व आवश्यक असेल तेथे फक्त विरोध करावा असे गोखल्यांना वाटे, तर टिळक प्रत्येक ठिकाणी ब्रिटिशांची वाट अडवायला अस्तन्या सावरून बसलेले!... परकीय पाहुण्यांची मने जिंकण्यात गोखले गुंतलेले, तर त्यांना हाकलून लावण्याची टिळकांना घाई झाली होती. काही बुद्धिमान मोजकी मंडळी हा गोखल्यांचा आधार तर, लाखोंचा अफाट जनसागर हे टिळकांचे बळ."

मवाळ कालखंडात ब्रिटिशांशी सुधारणेचा अर्ज व आर्जव यावर भर होता तर जहाल कालखंडात हक्काची भाषा याचा वापर होता. वसाहतीचे स्वराज्य हा मवाळांचा व्होरा होता तर जहालांनी पूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. ब्रिटिशांच्या कृपादृष्टीचे मवाळ पुरस्कर्ते होते आणि जहाल मात्र ब्रिटिशांच्या अन्यायाचे विरोधक होते. मवाळ - जहाल या दोन्ही कालखंडात आपल्या भूमिका मांडणारे बुद्धिवादी राजकारणी भारताने पाहिले. कार्यप्रणालीचे हे द्वंद्व शेवटी भारतातील सामान्य माणसाच्या कल्याणासाठी व हक्कासाठी कटिबद्ध होते, याचा विसर न व्हावा.

### टिळकांचा काळ आणि इतर...

लॉर्ड कर्झन यांनी १९०५ ला बंगालची फाळणी केली. हिंदू - मुस्लीम यांचे भावनिक पृथःकरण करण्याचा मूळ उद्देश त्यामागे होता. वंग भंग आंदोलन पेटले, हिंदू - मुस्लीम ऐक्याचे नारे दिले जाऊ लागले. एका राष्ट्राच्या स्वरूपात भारताने साकार रूप धारण केल्याचे स्पष्ट दिसत होते. कर्झनशाहीने जुलमी राजवटीचे दर्शन घडविले होते. बंगालात आंदोलन सुरू झाले त्याचे लोण देशभर पोहोचवायची जबाबदारी जहालमतवादी पुढाऱ्यांनी घेतली. केसरी व मराठा वर्तमानपत्रातून सरकारवर प्रचंड

हल्ले टिळक करत होते. लोकमान्य टिळकांनी सर्व सामान्य माणसाला राष्ट्रीय चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी चतु:सूत्रीचा कार्यक्रम सांगितला. केसरीत टिळक लिहितात, "आपला देश हा विशाल वृक्ष आहे. स्वराज्य हा त्याचा बुंधा आहे आणि स्वदेशी व बहिष्कार या फांद्या आहेत. स्वदेशीचं अंतिम पर्यवसान स्वराज्यातच होतं." स्वदेशी वस्तूंचा वापर, परकीय मालावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणाचा स्वीकार याद्वारेच स्वराज्य साकार होणार हा टिळकांचा विश्वास होता. टिळकांच्या या चतु:सूत्रीला या काळात दादाभाई नौरोजींचा एक संदेश पूरक ठरला. दादाभाईंनी भारतीयांना या संदेशातून केवळ ध्येय सांगितले नाही तर ते संपादन करण्याचा मार्गही स्पष्ट दाखवला. दादाभाई म्हणतात, "चळवळ करा, अखंड चळवळ करा. चळवळ म्हणजेच लोकशिक्षण आणि चळवळ म्हणजेच लोकशक्ती. एकजुटीने रहा, चिकाटीने लढा द्या आणि त्यायोगे स्वराज्य मिळवून दारिद्र्यात खितपत पडलेल्या आपल्या कोट्यवधी गरीब बांधवांना वाचवा." दादाभाईंनी आयुष्याच्या शेवटी आपले वजन जहालांच्या पारड्यात टाकले.

लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांनी लेखणी व वाणी यांचं दुधारी हत्यार उपसलं. बहिष्काराची चळवळ देशव्यापी करण्याचा कार्यक्रम आखला. यात अरविंद घोष हेही सामील झाले. घोष म्हणाले, "राजकीय स्वातंत्र्य हा राष्ट्राचा प्राणभूत श्वासोच्छवास आहे. प्रथम राजकीय स्वातंत्र्य मिळवायचे उद्दिष्ट ठेवलं पाहिजे." राजकीय स्वातंत्र्याचा आवाज स्पष्ट होत असतानाच ढाका या ठिकाणी नवाब सलिमुल्ला व इतरांच्या पुढाकाराने ३० डिसेंबर १९०६ ला 'मुस्लीम लीग' स्थापन झाले. याच वर्षी महमंदअली जीना काँग्रेसमध्ये सामील झाले होते. लीगच्या निमित्याने एका नव्या अंतर्विरोधाचा प्रारंभ झाला होता.

लोकजागृतीसाठी धार्मिक व ऐतिहासिक प्रतिकांचा वापर करण्याला टिळकांनी प्राधान्य दिले. सार्वजनिक स्वरूपात गणपती उत्सव व छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करून संघटन व नेतृत्वाचा विकास करायला टिळकांनी चालना दिली. तर बंगालमध्ये बिपिनचंद्र पाल यांनी 'काली पूजा' आरंभ केली.

एकीकडे लोकांत राष्ट्रचेतना व राष्ट्रीय अस्मिता निर्माण होत असताना १९०७ च्या सूरत येथील काँग्रेस अधिवेशनात अभूतपूर्व गोंधळ मवाळ व जहाल यांच्यात झाला. हे घडत असतानाच बंगालच्या फाळणीला कडाडून विरोध जनसामान्यातून चालूच होता. याला शांत करण्यासाठी मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा १९०९ साली ब्रिटिशांनी पारित केला. परंतु तरीही वंग भंग आंदोलनाची धार बोथट होत नव्हती. अंतिमतः १२ डिसेंबर १९११ रोजी ब्रिटिश राजपुत्र पंचम जॉर्ज यांनी दिल्लीत बंगालची

फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. बंगालची फाळणी रद्द झाल्याने जनआंदोलनाची ताकद सामान्यांना समजून आली.

ब्रिटिशांच्या फुटीरतावादी धोरणांना बळी न पडता हिंदू मुस्लीम यांच्यात सहकार्य वाढावे आणि स्वराज्यासाठी काँग्रेस व मुस्लीम लीग समन्वय प्रस्थापित व्हावा यास्तव १९१६ ला लखनौ करार करण्यात आला. १९१६ सालीच आयर्लंड येथील श्रीमती ॲनी बेझंट व लोकमान्य टिळकांनी एकत्र येत 'होमरूल चळवळ' (स्वशासनाची चळवळ) आरंभली. होमरूल चळवळ दडपण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. लोकमान्य टिळकांना राजद्रोहाचा खटला ठेवून अटक केली. बेझंट यांनाही अटक झाली. पण टिळक यातून निर्दोष सुटले. होमरूल चळवळ निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ होती. राष्ट्रीय आंदोलन वाढत आहे हे लक्षात घेऊन १९१९ ला मॉंटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा कायदा ब्रिटिशांनी पारित केला.

तुर्कस्थानच्या सुलतानास जगभरातील मुस्लीम खलिफा (धर्मगुरू) मानतात. प्रथम विश्वयुद्धात तुर्कस्थान ब्रिटिशांच्या विरोधात लढला. त्याचा पराभव झाला. खलिफाला बंदी करू नये, तह लादू नये, तुर्कस्थानचा भूभाग त्यास वापस करावा, या मागणीसाठी खिलापत चळवळ केली गेली. भारतात काँग्रेस व मुस्लीम या चळवळीत सहभागी झाले.

अहिंसेच्या मार्गाने लढल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य आंदोलनाला दडपून टाकण्यासाठी इंग्रजांनी शस्त्राचाच वापर केला. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बागेत शांततेच्या मार्गाने रौलेट कायद्याचा निषेध करणाऱ्या सभेवर जनरल डायर याने बंदुकीच्या १६०० फैरी झाडल्या. एक हजारहून जास्त निरपराध माणसे मारली गेली. या हत्याकांडाबद्दल जनरल डायरचा सत्कार करून दोन हजार पौंड एवढी रक्कम त्याला भेट दिली. हे सर्व क्रौर्याच्या सीमा ओलांडणारे होते. जालियनवाला हत्याकांडाचा निषेध म्हणून रविंद्रनाथ टागोर यांनी ब्रिटिश सरकारने दिलेली 'सर' ही पदवी परत केली.

दरम्यानच्या काळात मोहनदास करमचंद गांधी राष्ट्रीय आंदोलनात सहभागी होत होते. लोकमान्य टिळकांनी याच सुमाराला काँग्रेस लोकशाही पक्ष अशी नवी संघटना काँग्रेसला पूरक म्हणून स्थापन केली. या संघटनेचा कार्यक्रम पूर्ण राजकीय होता. गांधीजींनी टिळकांची भेट घेतली. आपल्या असहकाराच्या चळवळीबद्दल चर्चा केली. टिळकांना ती योजना पसंत पडली. १ ऑगस्ट १९२० रोजी गांधीजींनी असहकार चळवळ सुरू करायचं ठरवलं होतं. मात्र त्याच दिवशी पहाटे टिळकांचे निधन झाले. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' आणि 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे'

असे अग्रलेख लिहून भारतीयांना सरकारला जाब विचारायला लावण्याची वृत्ती बिंबविणाऱ्या टिळकांचा तो बाणा वर्तमान काळात लोकांनीही सरकारच्या प्रती जर ठेवला तर सुडाचे राजकारण सत्ताधाऱ्यांना करण्याची हिंमत सहज होणार नाही आणि डोके जागेवर ठेवून सरकार काम करेल. टिळकांनी चळवळ बुद्धिवाद्यांच्या तावडीतून मोकळी करत ती जनसामान्यांची बनविली. यातच लोकमान्य टिळकांचे वेगळेपण आहे. टिळकांच्या निधनाने एक युग संपलं आणि त्याच दिवशी असहकार चळवळीचा प्रारंभ ज्या गांधीजींनी योजिला होता, त्या गांधींचे एक युग सुरू झाले.

## बीज क्रांतीचे

एकीकडे भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनातील प्रतिकार पूर्णतः निःशस्त्र होता मात्र दुसरीकडे अहिंसेने व आर्जवाने इंग्रज आपल्याला स्वातंत्र्य देणार नाहीत या कट्टर भूमिकेने क्रांतीचा मार्ग चोखाळणारे क्रांतिकारकही निपजले. वासुदेव बळवंत फडके यांनी हा मार्ग निवडला होताच. रँडचा खून करणारे चाफेकर बंधू, १९०९ मध्ये कर्नल विलियम कर्झन वायली याला ठार मारणारे मदनलाल धिंग्रा, अनुशीलन समितीची स्थापना करणारे पी. मित्रा, १९०५ साली 'भवानी मंदिर' नावाची पुस्तिका लिहून क्रांतिकारी कार्याला प्रेरणा देणारे बीरेंद्रकुमार, गदर चळवळीचे आत्मा असणारे लाला हरदयाळ या सर्व मंडळींनी क्रांतीचे बीज तरुणांच्या मनात पेरत भारतीय स्वातंत्र्यासाठी हाती शस्त्र धरले. ब्रिटिशांनी या क्रांतिकारकांना दहशतवादी संबोधले. आपल्या क्रांतिकार्याला एक संघटित रूप यावे आणि ब्रिटिश सरकारला 'जशास तसे' उत्तर द्यावे या धारणेतून सचिंद्रनाथ सन्याल, योगेशचंद्र चॅटर्जी, रामप्रसाद बिस्मिल, भगतसिंग, शिव वर्मा, सुखदेव, भगवतीचरण वोरा, चंद्रशेखर आझाद या तरुणांनी १९२८ साली 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनची' स्थापना केली. ९ ऑगस्ट १९२५ ला काकोरी कट, १७ डिसेंबर १९२८ रोजी सँडर्सचा खून, ८ एप्रिल १९२९ ला केंद्रीय कायदेमंडळात आवाजी बॉंब फेकणे या सर्व गोष्टी या क्रांतिकारी संघटनेच्या क्रांतिकारकांनी केल्या. 'बहिऱ्यांना ऐकू जाण्यासाठी मोठ्या आवाजाची गरज असते.' असे म्हणत भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी स्वतःला अटक करून घेतली. भगतसिंगानी समाजवादी व धर्मनिरपेक्ष भारताचे स्वप्न पाहिले होते. आयुष्यभर नास्तिक राहिलेल्या भगतसिंगाने आपल्या आयुष्यासाठी दोन घोषणा पुरेशा असल्याचे म्हटले होते. त्या म्हणजे 'इन्कलाब जिंदाबाद, साम्राज्यवाद मुर्दाबाद.' शोषणमुक्त समाजाचे स्वप्न पाहणाऱ्या साडेतेवीस वयाच्या भगतसिंगाला आणि त्याचे साथीदार सुखदेव व राजगुरू यांना २३ मार्च १९३१ ला लाहोर कारागृहात फाशी देण्यात आली. "जे आमच्या जगण्याने साध्य होणार नाही ते

मरणाने साध्य होईल", असे म्हणणारे भगतसिंग आपल्या बलिदानाने लोकात जागृती करू शकले. महात्मा गांधी म्हणाले होते, "आमचे मस्तक भगतसिंगाच्या देशभक्ती, साहस, जनतेविषयी प्रेम आणि बलिदानासमोर झुकून जाते." क्रांतिकारकांचा उच्चकोटीचा ध्येयवाद राष्ट्रीय आंदोलनात नवचैतन्य निर्माण करणारा होता. क्रांतीचे ते बीज प्रत्येक भारतीयांच्या मनात आजही पडण्याची गरज आहे. ज्या कारणास्तव क्रांतीचा मार्ग निवडला ती व्यवस्था व तो ध्येयवाद मूर्त रूपात आला का?

### स्वराज्य म्हणजे...

टिळक, गांधी आणि राष्ट्रीय आंदोलनातील जे धुरीण ज्या स्वराज्याबद्दल बोलत होते ते स्वराज्य म्हणजे केवळ इंग्रजांना भारतातून बाहेर काढणे इतपत मर्यादित होते का? तर याचे उत्तर 'नाही', असे आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्याचा अर्थ सांगताना म्हटले की, "स्वराज्य म्हणजे आपले राज्य एवढा त्याचा अर्थ नाही.'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ दोन प्रकारे होऊ शकतो. एक 'सुव्यवस्थित राज्य' आणि दुसरा 'सुखकारक राज्य' होय." यावरून स्वराज्याची संकल्पना व व्याप्ती मोठी असल्याचे लक्षात येते.

बिपिनचंद्र पाल यांनी स्वराज्याचा अर्थ प्रतिपादित करताना म्हटले होते की, "स्वराज्य म्हणजे स्वशासन. स्वातंत्र्य ही नकारात्मक संकल्पना आहे तर स्वराज्य ही सकारात्मक कल्पना आहे."

१९०९ साली एका प्रवासात महात्मा गांधीजींनी 'हिंद स्वराज्य' ही पुस्तिका लिहिली. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात अजून सक्रिय सहभागी नसणाऱ्या गांधींनी स्वराज्य कसे असावे याची मीमांसा या पुस्तकात केली आहे. पाश्चात्त्य सभ्यतेला विरोध करताना ब्रिटिश संसदीय व्यवस्थेला, मोठ्या यंत्रांना, रेल्वे, डॉक्टर, वकील यांना हिंद स्वराज्यात स्थान असू नये असे महात्मा गांधी म्हणतात. ग्रामकेंद्रित व्यवस्थेचा पुरस्कार करताना गांधी भारतीय धाटणीच्या राजकीय प्रारूपाला साकारण्याचा सल्ला देतात. 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात स्वराज्याबद्दल महात्मा गांधी म्हणतात, "आपल्यावर आपले राज्य चालविणे म्हणजे स्वराज्य होय आणि हे आपल्या हातात आहे. स्वराज्य प्रत्येकाने स्वत:साठी मिळविले पाहिजे, निर्माण केले पाहिजे. दुसऱ्याने दिलेले स्वराज्य नव्हे तर परराज्य आहे. इंग्रजांना घालवले तर स्वराज्य मिळाले असे म्हणणे योग्य नाही." स्वराज्याबद्दल व्यापक विचार ठेवून भारताचे स्वातंत्र्य आंदोलन लढले गेले होते. सत्तांतर हा स्वराज्याचा उद्देश नव्हता. स्वराज्याचे उदात्त ध्येय पूर्णत्वाला गेले का? याचे चिंतन स्वातंत्र्याची पंचाहत्तरी पार केल्यानंतर तरी होणे अपेक्षित आहे.

## समाजवादी भारताचे चित्र

काँग्रेस अंतर्गतच समाजवादी विचाराचा पुरस्कार करणाऱ्यांचा एक मोठा गट होता. हे काँग्रेसमधील डावे मानले जात असत. सुभाषचंद्र बोस याबाबत म्हणतात, "काँग्रेसमधील डावे लोक केवळ साम्राज्यवादविरोधी होते असे नव्हे, तर त्यांना राष्ट्रीय जीवन समाजवादी सिद्धांतावर आधारित असावे, असे वाटत होते."

पंडित नेहरू समाजवादाचा पुरस्कार करत होते. त्यांनी लोकशाही समाजवादाचा विचार मांडला. जुलै १९३१ मध्ये जयप्रकाश नारायण, फुलनप्रसाद वर्मा यांनी बिहार समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९३३ मध्ये पंजाब समाजवादी पक्ष स्थापन झाला आणि ऑक्टोबर १९३४ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस समाजवादी पक्ष आपल्या घटनेसह व १५ कलमी कार्यक्रमासह स्थापन करण्यात आला. हा पक्ष काँग्रेसच्या विरोधातील पक्ष नव्हता. समाजवादी समाजरचना करून शोषणाची समाप्ती करणारा भारत निर्माण करण्यासाठी हा समाजवादी विचारांचा गट कार्यरत होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक स्वातंत्र्य व समतेचे संघर्ष पर्व

भारताच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी एकीकडे रान पेटले असतानाच दुसरीकडे सामाजिक स्वातंत्र्यासाठी व समतेसाठी लढणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी उपेक्षितांचा लढा लढत होते. बहिष्कृत भारत, मूकनायक, समता व जनता या वृत्तपत्रातून आपला सामाजिक समता व स्वातंत्र्याचा विचार मांडत असतानाच भारतातील आर्थिक प्रश्नावर सूक्ष्म व सखोल भाष्य डॉ. आंबेडकर या काळात करत होते. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा लाभावी यासाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा, मनुस्मृतीचे दहन याद्वारे समाजातून अस्पृश्यता, उच्च-नीच भेद हद्दपार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निकराचा लढा दिला. जातीय निवाड्याला महात्मा गांधींनी विरोध केला आणि गांधीजी येरवडा येथे उपोषणाला बसले. त्यांच्या प्राणाचे रक्षण करण्याच्या उदात्त भावनेने २५ सप्टेंबर १९३२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गांधीजी यांच्यात 'पुणे करार' झाला. राखीव मतदारसंघाची निर्मिती यातून झाली.

सामाजिक स्वातंत्र्य व समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्य दुबळे ठरत असते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा संघर्ष महत्त्वपूर्ण ठरतो.

## गांधी युग : सत्याग्रहाचा सहप्रवास

दक्षिण अफ्रिकेत सत्याग्रह करून भारतात परतलेल्या मोहनदास करमचंद गांधी यांना त्यांच्या गुरूंनी म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले यांनी प्रथम भारत भ्रमण करण्यास सांगितले. सामान्यांचे प्रश्न व देश समजून घेण्यासाठी गांधीजी निघाले. देशातील लोकांना पाहून बॅरिस्टर गांधींनी सुटाबुटाचा त्याग केला. 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' हा विचार स्वीकारत गुडघ्यापर्यंत धोतर व खांद्यावर पंचा इतकेच वस्त्र त्यांनी स्वीकारले. देशभर फिरत असताना देशातील लोकांना अंगभर कपडे नाहीत तसेच स्वदेशीचा मूलमंत्र द्यायचा तर स्वदेशी वस्त्र कुठे? असे प्रश्न उपस्थित झाले. १९१७ मध्ये गोध्रा येथे झालेल्या सभेत गांधींची भेट गंगाबेन मुजुमदार यांच्याशी झाली. गंगाबेन यांनी गांधीजींना सूत कातण्यासाठी चरखा आणून देण्याचे वचन दिले. प्रचंड प्रयत्नानंतर गंगाबेन मुजुमदार यांनी गांधीजींना साबरमती आश्रमात चरखा आणून दिला. या चरख्याने स्वतःचे वस्त्र स्वतः विणण्याची चळवळ उभी झाली. खादी केवळ वस्त्र नाही तर तो एक विचार आहे. खादीने परदेशी कपड्यावरील बहिष्कार टाकण्याच्या चळवळीला व स्वदेशी वस्त्राच्या वापराला बळ दिले. खादी हे विश्वासाचे वस्त्र झाले. राजकारणात व समाजकारणात खादी नैतिकतेचे प्रतीक बनली.

गांधीजींनी 'सविनय प्रतिकार' या शब्दालाही नकार दिला होता. कारण प्रतिकारात परत हिंसा अंतर्भूत असते. विधायक अहिंसेचा पुरस्कार करत सत्याचा आग्रह धरला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. रामराज्याची (God State) कल्पना मांडत गांधीजींनी भारताचे स्वातंत्र्य आंदोलन अहिंसक मार्गाने जनआंदोलन बनविले. बिहारच्या चंपारण्य सत्याग्रहापासून प्रारंभ करणाऱ्या गांधींचा पहिला सत्याग्रह नीळ उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी होता. गुजरातमधील शेतकऱ्यांचा खेडा सत्याग्रह सरदार पटेलांना सोबत घेऊन गांधींनी केला. रौलेट कायद्याचा सविनय मार्गाने कायदेभंग करण्याचे गांधींनी आवाहन केले. १९२० च्या डिसेंबर महिन्यात काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला भरले. त्यात असहकार आंदोलनाचा ठराव मंजूर झाला. गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनाचा एक पैलू संघर्षात्मक होता तर दुसरा विधायक होता. गांधीजी म्हणाले होते, "अहिंसक असहकाराचा मार्ग योग्य रितीने चोखाळला तर भारताला एक वर्षात स्वराज्य मिळेल." असहकार आंदोलनात लहान-थोरासहित सर्व सहभागी झाले. असहकार आंदोलनाला मिळणाऱ्या पाठिंब्यामुळे इंग्रज सरकारने यास दडपण्याचा प्रयत्न सुरू केला. यातच ५ फेब्रुवारी १९२२ या दिवशी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा या ठिकाणी प्रक्षुब्ध जमावाने पोलीस चौकीवर हल्ला

करून २१ पोलीस व एक अधिकारी यांना जिवंत जाळले. या हिंसक प्रकारामुळे 'देश अजून स्वराज्यासाठी तयार झाला नाही', असे म्हणत गांधीजींनी असहकार आंदोलन मागे घेतले. १० मार्च १९२२ ला राजद्रोहाच्या आरोपाखाली गांधीजींना अटक झाली. त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. मात्र प्रकृती बिघडल्यामुळे १९२४ ला सरकारने त्यांना बिनशर्त सोडले. टीकेची पर्वा न करता, चुकीचे समर्थन न करता गांधीजींनी दाखविलेली मूल्यांप्रती कठोर निष्ठा राजकीय व्यक्तींसाठी सदैव अनुकरणीय आहे.

डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारित करून २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्यात आला. याच दिवशी देशभर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचे ठरले आणि याचे नेतृत्व महात्मा गांधीजी करणार होते. राजसत्तेने लादलेल्या दडपशाहीचे व अन्यायकारक कायद्यांचे पालन करायचे नाही आणि कायदेभंग केल्याने झालेली शिक्षा भोगायची हा सविनय कायदेभंगाचा अर्थ होता. १२ मार्च १९३० रोजी ७८ अनुयायांसह गांधीजी साबरमती आश्रम ते गुजरात समुद्र किनाऱ्यावरील दांडी या गावी निघाले ते मिठाचा कायदा मोडण्यासाठी. ३७५ कि. मी. चे अंतर २४ दिवसात चालत पार करत ६ एप्रिल १९३० रोजी मूठभर मीठ उचलून ब्रिटिशांच्या कायद्यांना आव्हान दिले. जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह याचाच परिणाम होते. पुढे १९३०, १९३१, १९३२ अशा तीन गोलमेज परिषदा झाल्या. यातून विशेष काही निष्पन्न झाले नाही.

१९३५ ला ब्रिटिश पार्लमेंटने कायदा केला. या कायद्याने भारतीयांची राजकीय व प्रशासकीय रचना केली. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. याच दरम्यान मार्च १९४० मध्ये महमंदअली जीना यांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. मुस्लीम लीग पाकिस्तान मागणीसाठी आग्रही झाली. सुभाषचंद्र बोस यांनी १९३९ मध्येच राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना सुभाषबाबूंनी केली. पुढे जपानच्या मदतीने बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापनाही केली. काँग्रेसचा राजीनामा दिला तरी सुभाषचंद्र बोस हे गांधी व नेहरू विरोधक नव्हते. आझाद हिंद सेनेतील तुकड्यांना त्यांनी गांधी व नेहरूंची नावे दिली. आज सुभाषचंद्र बोस यांच्या नावाचा वापर नेहरू-गांधी यांचा पर्याय म्हणून केला जात आहे, हे ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचेच!

क्रिप्स मिशन अयशस्वी झाल्यास ८ ऑगस्ट १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारणीने वर्धा येथे १४ जुलै १९४२ ला 'भारत छोडो' (चले जाव) चा ठराव मंजूर केला. गवालिया टँक मुंबई येथे गांधीजींनी देशवासियांना 'करा किंवा मरा' असा संदेश दिला. ९ ऑगस्ट पासून भारत छोडो आंदोलन सुरू होणार होते, मात्र ८ ऑगस्ट

१९४२ च्या मध्यरात्री प्रमुख नेत्यांना गांधीजी सहित अटक केली गेली. तरीही ९ ऑगस्ट १९४७ ला अरुणा असफ अली या तरुणीने चरखा असलेला तिरंगा हातात घेऊन गवालिया टँक येथे आंदोलनाचे रणशिंग फुंकले. भूमिगत नेत्यांच्या चळवळीतून हे आंदोलन अधिक पसरत गेले. बंगाल प्रांतात काही ठिकाणी व मुंबई प्रांतातील सातारचे नाना पाटील यांचे प्रतिसरकारेही या काळात अस्तित्वात आली. स्वातंत्र्याचा लढा निकराचा झाला होता. अशा वेळी इंग्रज सरकारला भारतास स्वातंत्र्य देणे भागच होते. दुसरे महायुद्ध संपले होते. जगभर साम्राज्यवाद व वसाहतवादाविरूद्ध जागतिक लोकमत तयार होत होते. इंग्लंडचे तत्कालीन प्रधानमंत्री ॲटली यांनी आम्ही भारताला लवकरच स्वातंत्र्य देऊ असे घोषित केले. कॅबिनेट मिशन योजना पाठविली गेली. राज्यघटना निर्मितीसाठी संविधान सभा निवडणूक घेऊन निर्माण झाली. मात्र मुस्लीम लीग पाकिस्तानसाठी प्रचंड आक्रस्ताळेपणा करू लागली. अंतिमतः माऊंट बॅटन योजनेनुसार १४ ऑगस्ट १९४७ ला पूर्व-पश्चिम पाकिस्तान अस्तित्वात आला आणि १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.

## उपसंहार

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा खूप मोठा भाग सत्याग्रह, अहिंसात्मक लढा याने व्यापलेला आहे. तत्कालीन वैश्विक इतिहासाकडे कटाक्ष टाकल्यास हे स्पष्ट होते की, भारताप्रमाणे स्वातंत्र्याचा लढा कोणत्याच देशात लढला गेला नाही. प्रत्येक माणूस एक स्वतंत्र चळवळ असावा असा हा लढा होता. राजकीय मूल्यांचे खूप मोठे संचित या स्वातंत्र्य आंदोलनातून तयार झाले. ज्या ध्येयवादाने व उदात्त भावनेने स्वातंत्र्य आंदोलन लढले गेले ते लोकशाही जीवनपद्धतीला सगुण साकार करणारेच होते. राज्यघटनेने आपण प्रजासत्ताक स्वीकारलेच मात्र लोकशाहीचे केवळ संहितीकरण करून आपण थांबलो नाही. स्वातंत्र्यानंतरच्या सरकारांनी आणि नेतृत्वाने भारतात स्वातंत्र्य आंदोलनातून विकसित ध्येयवाद कसा मूर्त रूपात प्रगट करता येईल यासाठी अखंड धडपड केली. चुकीचे पायंडे पडू नयेत आणि लोकशाही ही केवळ राजकीय औपचारिकतेचा भाग बनून राहू नये यासाठी आपले आचरण लोकशाहीभिमुख करणारी मंडळी नेतृत्वाच्या स्वरूपात लाभली. प्रारंभी विरोधी पक्ष वाढला पाहिजे, टिकला पाहिजे याची विशेष काळजी घेतली गेली. पंडित नेहरू हे स्वातंत्र्य आंदोलनातून घडलेले नेतृत्व, ते स्वातंत्र्यानंतर भारताचे प्रधानमंत्री झाले. त्यांना स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवादाची पूर्णतः जाणीव होती. हुकुमशहा होण्याची संधी त्यांना होती; मात्र त्यांनी लोकशाहीचा पदर केव्हाच सोडला नाही. त्यांनी लोकशाही मूल्य वास्तवात साकार व्हावीत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनातून अपेक्षित

लोकशाहीला एका राजकीय शासनपद्धतीच्या रूपातच केवळ पाहिले नाही. पंडित नेहरूंच्या शब्दात "मतदान, निवडणुका इत्यादी बाह्य उपचारांपेक्षा लोकशाहीचा अर्थ अधिकच सघन आहे. अंतिम दृष्टीने लोकशाही म्हणजे विचार करण्याची, आचाराची, शेजाऱ्यांशी वागण्याची एक पद्धती होय... शेवटी तुम्ही राजकीय नव्हे तर मानवी मूल्यांपाशी येता... हवे तर त्यांना सांस्कृतिक, चैतन्यशाली मूल्ये म्हणा." ही मूल्येच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या प्रसंगी राजकीय नेतृत्वापासून सामान्यापर्यंतच्या आचरण व्यवहारात रूजली पाहिजेत तरच स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवादाला खरा अर्थ प्राप्त होऊ शकेल.

नवभारताचे निर्माण करण्यासाठी नियतीशी केलेला करार विकासाच्या अनेक वाटा चोखळणारा ठरला. परंतु भौतिक, आर्थिक, वैज्ञानिक, वैचारिक विकासाचे अनेक टप्पे आपण गाठले असले तरी १९७० पासून राजकारणाचे क्षुल्लकीकरण वाढत राहिले. नव्वदीच्या नंतर जन्माला आलेल्या पिढीला स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवादाशी खूपसा संबंध ठेवणे महत्त्वाचे वाटले नाही. त्यामुळे एकविसाच्या शतकात उथळ राजकीय नेतृत्वाची निवड करण्याकडे भारतीय मतदारांचा कल वाढला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्त्याने स्वातंत्र्य आंदोलनातील ध्येयवादाशी एक नवे सूत्र जोडावे लागेल, ते म्हणजे जागरूक नागरिकाचे, मतदाराचे. प्लेटो म्हणाला होता, "जोडा शिवायचा असता तर आपण ज्याला ते नीट शिवायला येतात त्याच्याकडे जातो, परंतु राजकारणात निराळाच प्रकार. जो अधिक मते कशी मिळवावी हे जाणतो, तो राज्याचा कारभार चालवावयास लायक आहे असे आपण निःशंकपणे गृहीत धरतो. आपण आजारी पडलो तर कुशल वैद्याला बोलावतो, त्याला पदवी असते व त्याच्या योग्यतेची ती खूण असते. वैद्याचे आपण सौंदर्य पाहात नाही किंवा तो उत्कृष्ट वक्ता आहे की नाही ते पाहात नाही. तर मग जेव्हा सारे राज्य रूग्णावस्थेत असते, तेव्हा अत्यंत शहाणे व अत्युत्तम अशाचे मार्गदर्शन नको का? सार्वजनिक जीवनातून नालायक अधिकारी व नेते दूर करणे, फसवाफसवी दूर करणे यासाठी माणसे निवडणे व त्यांना तयार करणे यासाठी मार्ग शोधायला हवा." प्लेटोचे हे मत नीट समजून घ्यावे लागेल आणि मताधिकारातून तो मार्ग तयार करावा लागेल; तरच नव्या ध्येयवादाच्या निर्माणाची शक्यता आहे. अन्यथा जुन्या संस्थांची नावे बदलून आणि जुन्या ध्येयांना स्वतःचे आवरण गुंडाळून फसवेपणा वाढतच राहील.

संदर्भसूची :

१. *आचार्य श. द. जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६८*

२. *सुमन वैद्य, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९८५*

३. बिपन चंद्र, त्रिपाठी, डे, (अनुवाद मा. कृ. पारधी), स्वातंत्र्याचा लढा, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, २००८

४. कुमार केतकर, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०१०

५. सुमन वैद्य, शांता कोठेकर, महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्य लढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई, २००८

६. शिरीश सहस्त्रबुद्धे, बखर काँग्रेसची, राजहंस प्रकाशन, पुणे, १९८५

७. जयसिंगराव पवार, हिंदुस्थानचा राजकीय व घटनात्मक इतिहास, अजब पुस्तकालय, कोल्हापूर

८. गोविंद तळवलकर, नवरोजी ते नेहरू, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९६९

९. श. गो. कोलाटकर, स्वतंत्र भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७

१०. रा. श्री. मोरवंचीकर, आधुनिक भारत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९४

११. भारतातील राजकीय वारसा, Pol.-288, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२

१२. स. मा. गर्गे, गोपाळ गणेश आगरकर, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, २००४

१३. राम शेवाळकर (संपा.), लोकमान्य टिळकांचे निबंध, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, २००९

१४. पं. जवाहरलाल नेहरू, (अनु. साने गुरूजी, करंदीकर), भारताचा शोध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८९

१५. बी. एल. ग्रोवर, एन. के. बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी प्रा. लि., नवी दिल्ली, २००२

१६. जनार्दन वाघमारे, (अनु. नवले, नाईनवाड), गुलामी इतिहास के आईने में, आर. के. पब्लिकेशन, मुंबई, २०२१



**डॉ. राजशेखर सोलापुरे**

संत ज्ञानेश्वर नगर, रिंग रोड, लातूर

मो. : ९४२३३४५८२२


□□□